# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

प्रत्र क्र.रासेयो/ २३७ / २०१६—१७
दिनांक : ०१ ऑगष्ट २०१७

प्रति,
प्राचार्य,
सर्व सलग्न महाविद्यालये

महोदय / महोदया,

आपणास कळविण्यात येते कि सन २०१२ . २०१३ पासुन मुंबई विद्यापीठ परिपत्रक कमांक घ . म ./ ४/ २०१२ . १३ दिनांक १० एप्रिल २०१२ प्रमाणे महाविद्यालयात प्रवेशाच्या वेळी प्रत्येक विद्यार्थ्याकडुन रूपये १० /- 'राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाह एकक' या सदराखाली शुल्क स्विकारण्या विषयी कळविण्यात आले होते . तथापी बऱ्याचशा महाविद्यालया कडुन सदरचे शुल्क आकारण्यात येत नाही . आकारलेले शुल्क वित्त व लेखा विभागाकडे पाठविले जात नाही .

तरी वरील परिपत्रका प्रमाणे मुंबई विद्यापीठाशी सल्लग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये / संस्था यांनी सर्व विद्यार्थाकडुन महाविद्यालयात प्रवेशाच्या वेळी प्रत्येक विद्यार्थ्याकडुन रूपये १०/-'राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाह एकक'या सदराखाली आकारण्यात यावेत . सदरची रक्कम हि वित्त व लेखा अधिकारी मुंबई विद्यापीठ यांचेकडे पाठविण्यात यावी .

आपला विश्वासू

प्रॉ . बाबासाहेब सं . बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा . से . यो . विभाग

मुंबई विद्यापीठ

क्र. प्र.म./ ४ /.२०१२ २०१३

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये/संस्था यांच्या तर्फे संबंधित/सोसायटीचे अध्यक्ष /सचिव यांना असे कळविण्यात येते की, राज्यातील सर्व उच्च शैक्षणिक महाविद्यालये/संस्थामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व कृषी, अकृषी विद्यापीठात स्वयंनिर्वाहित राष्ट्रीय सेवा योजना एकक स्थापनेबाबतचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१०/(१३२/२०१०)/साशि-७ दिनांक ९ डिसेंबर, २०१० अन्वये सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ पासून करण्यात यावी याबाबतचा ठराव व्यवस्थापन परिषदेपुढे बाब क्र. २ दिनांक १५ सप्टेंबर, २०११ रोजी ठेवण्यात आला व मान्य करण्यात आला. त्यानुसार सर्व संलग्न महाविद्यालयांनी सन २०१२-२०१३ च्या प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून रु. १०/- इतके शुल्क आकारुन ते एकत्रितपणे विद्यापीठ वित्त व लेखा अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेत क्रमांक २०१०१०२११०८२७००१ आहे.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १० एप्रिल, २०१२

(कुमार भ. खैरे)
कुलसचिव

प्रत,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व संस्थाचे संचालक यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत माहितीसाठी रवाना :-

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय भवन, मॅडम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
२) मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१.
३) मा. संचालक, तंत्र शिक्षण, एलफिस्टन तंत्रशिक्षण आवार, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१.
४) पीठासन अधिकारी, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालय तक्रार न्यायाधिकरण कार्यालय, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.

प्रत माहितीसाठी रवाना :-

१) उपकुलसचिव, प्राधिकरणे, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -४०० ०३२.
२) सहाय्यक कुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
३) मा. कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक, प्रभारी कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
४) स्वीय सहाय्यक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२
५) अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).
६) समन्वय, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई - ४०० ०९८.

(कुमार भ. खैरे)
कुलसचिव